## छेदुनि अंधाराला

छेदुनि अंधाराला, आल्या उजळत ज्योती
आत-बाहेर, चहूकडे आता प्रकाशच प्रकाश !

नको करू घाई, पैलतीरी जाण्याची
ऐलतीरीं तुझ्यासवे, मांडायची आहे ना आरास !

चुकले होते पाऊल जेंव्हा, अबोध वळणावरती
सापडले होते ना रे, तुझ्याच प्रेमाचे आकाश ?

पहीले स्टेशन जन्माचे, शेवटचे ते मृत्यु
मधले नाटक म्हणजे केवळ आयुष्य नावाचा प्रवास !

तिची-माझी भेट होते, होते ना अधून-मधून..
वाटा वेगळ्या व्हायला अजून, आहे थोडा अवकाश !

कसे कधी हे प्रेम अनावर, कशी अधीर ही "प्रीती"
कसे म्हणावे परस्परांना, अरे हो - पण सावकाश !

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**